गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक ६८ वा | सोमवार २४ जुलै २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 68 | Date : 24/07/2023 | blow : Manday | Page 4 | Price 4

## अतिवृष्टीने नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करा

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

मुंबई : बुलढाणा, यवतमाळ आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिल्ह्यांमधील पिकांचे तातडीने पंचनामे करुन शासनाकडे लवकर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले.

अतिवृष्टीग्रस्त भागातील नागरिकांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर, जळगाव जामोद तसेच यवतमाळ, नांदेडसह अनेक जिल्ह्यांमध्ये काल झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागातील पिके पाण्याखाली गेले आहेत. शेतीचेदेखील मोठे नुकसान झाले आहे. जिल्हा प्रशासनाने या झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करून शासनाकडे लवकर प्रस्ताव पाठविण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिव आणि मदत व पुनर्वसन विभाग तसेच मुसळधार पाऊस झालेल्या क्षेत्रातील विभागीय आयुक्त आणि



जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली. पुरामुळे जनजीवन विस्कळीत झालेल्या भागातील ग्रामस्थांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले असून त्यांना स्थानिक ग्रामस्थांच्या घरांच्या नुकसानीचेदेखील पंचनामे करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

अतिवृष्टीमुळे पूर आलेल्या गावांमधील ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले असून त्यांची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे, त्याठिकाणी ग्रामस्थांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात याव्यात आणि आपत्तीकाळात जिल्हा प्रशासनाने दक्ष राहण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.



**अक्कलकोट : शिक्षणमहर्षी कै.पंचप्पा कल्याणशेट्टी सर यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्य स्मृती स्थळावर अभिवादन करताना अक्कलकोटचे युवा आमदार सचिन कल्याणशेट्टी**

## बजरंग पुनिया आणि विनेश फोगाट यांना आशियाई स्पर्धांमध्ये थेट प्रवेश

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाने कुस्तीपटू विनेश फोगाट आणि बजरंग पुनिया यांना आशियाई स्पर्धांच्या चाचण्यांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीमध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. दरम्यान भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या ॲडहॉक समितीचे सदस्य भूपेंद्र सिंग बाजवा यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी म्हटलं की, सवलत देण्याचे धोरण फार पूर्वीपासून आहे. तुम्हाला संकेस्थळावर याबाबत माहिती मिळेल. कोणत्याही प्रकारची दुखापत न होऊ देण्यासाठी तुम्ही चांगल्या खेळाडूंना सूट देऊ शकता असं निवड प्रक्रियेच्या नियमावलीमध्ये आहे. मागील आशियाई खेळांमध्येही काही खेळाडूंना सवलत देण्यात आली होती. हायकोर्टाच्या निर्णयानंतर पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना अंडर-२० वर्ल्ड चॅम्पियन अंतिम पंघाल म्हणाले की, 'आमच्यासोबत असं का होत नाही. आम्हालाही संधी मिळायला हवी. या लोकांनी आता पदकं आणली तर पुन्हा हे लोकं चांगले आहेत असं सांगण्यात येईल आणि आम्ही पुन्हा मागे पडू.' त्यामुळे हा आमच्यावर अन्याय होत आहे असा दावा देखील अंतिम पंघाल यांनी केला आहे.

## महाराष्ट्रासह गुजरातमध्ये पावसाचा कहर, अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत

मुंबई : महाराष्ट्रापाठोपाठ आता गुजरातमध्येही पावसानं हाहाकार माजवलाय. गुजरातमधल्या अनेक शहरात पूरस्थिती (ऋश्रेव) निर्माण झालीये. त्यामुळे जनजिवन विस्कळीत झालंय. जुनागडमध्ये पुराच्या पाण्यात काहीजण अडकले होते. त्यांना एनडीआरफच्या मदतीने बाहेर



काढण्यात आलंय. नवसारी शहरातही पाणी शिरलंय. मुसळधार पावसामुळे गुजरातमधलं जुनागड पाण्याखाली गेले आहे. आज मात्र काहीशी पावसाने उसंत घेतल्याने पाणी ओसरायला सुरुवात झाली आहे. जिथे काल पुराच्या पाण्याचा लोंढा दिसत होता आज तिथे चिखलाचा गाळ दिसत आहे. काही ठिकाणी मात्र पूरस्थिती कायम आहे. पुरात अडकलेल्या नागरिकांना एनडीआरएफकडून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत केलं जात आहे.

जे चित्र गुजरातमध्ये पाहायला मिळतंय तेच चित्र गेल्या १५ दिवसांपासून दिल्लीत दिसत आहे. पण दिल्लीतल्या पुराचं कारण पाऊस नसून यमुना नदीच्या पाणी पातळीत झालेली वाढ आहेकाही ठिकाणी आता कुठे पाणी ओसरत होतं. तोवर पुन्हा एकदा दिल्लीवर पुराचं संकट दाटलंय. यमुनेच्या पाणी **। पान २ वर**

## 'तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांशी गैरवर्तन केले जात आहे'; सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी व्यक्त केली चिंता

नवी दिल्ली : आर्टिफिशियल इंटेलिजन्सकडे खढ क्षेत्रात नवीन क्रांती म्हणून पाहिले जात आहे. दरम्यान, भारताचे सरन्यायाधीश (CJI) डीवाय चंद्रचूड यांनी शनिवारी (२२ जुलै) टेक्नॉलॉजीच्या गैरवापराबद्दल चिंता व्यक्त केली. डीवाय चंद्रचूड म्हणाले की, सोशल मीडियाने आपल्याला सर्व वयोगटातील लोकांशी संपर्क साधण्याची परवानगी दिली आहे. पण, या नवीन संप्रेषण साधनाने ऑनलाईन गैरवर्तन आणि ट्रोलिंगसारख्या नवीन वर्तनांना जन्म



दिला आहे. तसेच, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) देखील गैरवापर, चुकीची माहिती पसरवली जात आहे. आयआयटी चेन्नईच्या ६० व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते.

आयआयटी मद्रासच्या दीक्षांत समारंभात उगख चंद्रचूड म्हणाले की, आजकाल आपण सर्वजण टेक्नॉलॉजीचा वापर करत आहोत. पण, तरीही आपल्याला त्याबाबत अनेक प्रश्न आहेत. तांत्रिक क्षेत्रातील तुम्हा सर्वांसमोरील हे एक मोठं आव्हान आहे त्यावर मात करणं गरजेचं आहे.

उगख चंद्रचूड म्हणाले की AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) मध्ये व्यक्तींचा गैरवापर, दिशाभूल, धमकावणे किंवा धमकावण्याची क्षमता आहे. नुकसानकारक **। पान २ वर**

### संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा तिसरा दिवस

## मणिपूरच्या मुद्द्यावर दोन्ही सभागृहांमध्ये घमासान होण्याची शक्यता

नवी दिल्ली : सोमवार (२४ जुलै) रोजी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा तिसरा दिवस आहे. त्याच पार्श्वभूमीवर संसदेत विरोधी पक्षांची बैठक पार पडणार आहे. या बैठकीमध्ये विरोधी पक्षांचे शिष्टमंडळ मणिपूरच्या दौऱ्याला पाठवण्याच्या विषयावर चर्चा होऊ शकते. तर दोन्ही सभागृहांमध्ये विरोधी पक्षांकडून पंतप्रधानांनी या प्रकरणावर स्पष्टीकरण देण्याची मागणी जोर धरु शकते. संसदेच्या परिसरात भाजप खासदारांकडून आंदोलन करण्यात येणार आहे. तर विरोधी पक्षांकडून संसदेतील गांधींच्या प्रतिमेजवळ आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच विरोधी पक्षांकडून बैठक घेऊन पुढील रणनितीवर चर्चा करण्यात येणार आहे. तर विरोधी पक्षांचे शिष्टमंडळ मणिपूर कधी पाठवयाचे त्याची तारीख ही निश्चित होऊ शकते.

राजस्थान आणि पश्चिम बंगालमध्ये दोन महिलांची विवस्त्र धिंड काढल्याप्रकरणी तसेच इतर राज्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराप्रकरणी सत्ताधारी पक्ष विरोधी पक्षांना घेरण्याच्या तयारीत आहेत. मणिपूरमध्ये दोन महिलांची विवस्त्र धिंड काढल्याप्रकरणी संसदेत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांमध्ये चांगलीच खडाजंगी झाली. त्यांनंतर संसदेचं कामकाज स्थगित करण्यात आलं होतं. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत विरोधी **। पान २ वर**

## पशुधन क्षेत्रासाठीच्या पहिल्या पत हमी योजने चा प्रारंभ

### ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना, ७५० कोटी रुपयांच्या पतहमी निधी न्यासाची स्थापना

नवी दिल्ली : पशुधन क्षेत्रात गुंतलेल्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) कर्ज वितरणाची प्रणाली मजबूत करण्यासाठी तसेच




जोखीमरहित विनातारण सुरळीत कर्ज उपलब्ध होण्यासाठी, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग, केंद्रीय पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाने २पत हमी योजना२ लागू केली आहे. या पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी (AHIDF) अंतर्गत पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विभागाने ७५० कोटी रुपयांचा पत हमी निधी न्यास स्थापन केला आहे. हा न्यास पात्र कर्ज देणाऱ्या संस्थांद्वारे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना विस्तारित पत सुविधांच्या २५% पर्यंत पत हमी कवच प्रदान करेल.

या पतहमी योजनेमुळे, सेवा न मिळालेल्या किंवा अत्यल्प सेवा मिळालेल्या पशुधन क्षेत्रासाठी सुलभ वित्तपुरवठा सुलभ करू शकेल, मुख्यत्वे पहिल्या पिढीतील उद्योजकांना आणि समाजातील वंचित घटकांना, ज्यांना त्यांच्या उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी संपार्श्विक सुरक्षा नसते.

वैयक्तिक उद्योजक, **। पान २ वर**

## करजगी ग्रामपंचायत निवडणूकीत नागरिक यंदा नवीन पर्याय शोधणार का?




अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील एक मोठी ग्रामपंचायत असलेली करजगी येथील ग्रामपंचायत कालावधीची मुदत २२ एप्रिल संपलेली आहे. आणि आता सध्या तेथे प्रशासकमार्फत कारभार चालू आहे. काही दिवसात ग्रामपंचायत निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. ह्यावेळी सरपंच पदासाठी ओबीसी सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाला असून थेट निवडणूक होणार आहे.गत पंचवार्षिक निवडणूकीच्या वेळी येथील उंबरजे व परतबादी हे कट्टर विरोधक गटाने निवडणूक बिनवरोध केली. गावातील लोकांना अंधारात ठेवून बिनविरोध निवडणूक केली अशी लोकांची भावना आहे. काही महिन्यापूर्वी देखील ह्या दोन्ही गटाने सोसायटी निवडणूक देखील बिनविरोध केली होती म्हणून गावातील लोक हे लोकशाही विरोधी कटकारस्थान आहे असे म्हणून गावातील नागरिक प्रचंड नाराजी व्यक्त करत आहेत. निवडणुका व्हाव्यात अशी बहुसंख्य लोकांची मागणी आहे.

गत पंचवार्षिक निवडणुक वेळी दोन्ही गटाने आपसातले राजकीय वैमनस्य मिटवून गावचा विकास व्हावा म्हणून माजी आमद्रार सिद्धाराम म्हेत्रे व विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी ह्यांच्या उपस्थितीत निवडणूक बिनविरोध करत प्रिया तोडकरी ह्यांना सरपंच व उंबरजे गटाचे ८ व परतबादी गटाचे ७ अशी सदस्य निवडण्यात आले. दोन्ही गटाने अडीच अडीच वर्षे सरपंच पदाचा कारभार बघावा असे ठरले होते. पण काहीच दिवसात दोन्ही गटात तंटामुक्त समिती अध्यक्ष निवडीवरून वाद निर्माण झाला व पुन्हा एकमेकांना शह कटशह देण्याचे राजकारण सुरु झाले. सरपंचच्या विरोधात अपहार केल्याचा आरोप करून विभागीय आयुक्तमार्फत चौकशी होऊन तीन वर्षानंतर त्याची निर्दोष मुक्तता झाली. ह्या सर्व गदारोळात अ वर्गाची ग्रामपंचायत असून देखील मोठ्या प्रमाणात निधी शिल्लक राहिली आणि विकासकामे रखडली. शेवटच्या टप्प्यात गावातील काही कामे घाई गडबडीने दोन्ही गटाने एकत्र येऊन मार्गी लावले पण त्या कामाची गुणवत्ता मार खाल्ली अशी नागरिकांची भावना आहे.

गेल्या काही दिवसांपासून गावात निवडणुकीचे वातावरण निर्मिती होत आहे. काही जण आपण पुढचा सरपंच होऊ शकतो का ? ह्याची चाचपणी करत आहेत.

काही दिवस अगोदर रवी लिंबोळे ह्यांनी कार्यकर्ते सोबत मोर्चे बांधणी करण्याचा प्रयत्न केला, पण योग्य प्रतिसाद न मिळाल्याने तूर्तास ते शांत आहेत. माजी सरपंच शिवलिंगप्पा नरोणे हे परताबादी गटाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत.काही दिवस अगोदर ते उंबरजे गटातून बाहेर पडून परतबादी गटाशी जवळीकता वाढवाली आहे. सरपंच पदाचा व विकास कामाचा दीर्घ अनुभव व स्वच्छ प्रतिमा हि त्यांची जमेची बाजू आहे. महेश कटारे हे तरुण गेल्या काही वर्षापासून आपल्या कामातून लोकांचे विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी विविध आंदोलने करून अपंग, बांधकाम कामगार, ग्रामीण रुग्णालय हे विषय मांडत आहेत. ते गावात तिसरी आघाडी निर्माण करून निवडणूक लढविण्याच्या तयारीत आहेत.

माजी सरपंच चिदानंद परतबादी हे सध्या गावचा राजकारणात रस दाखवत नाहीत व अंतर्गत गटबाजीने ग्रासलेले आहे. उंबरजे गटाकडून प्रीतम हिरेमठ ह्या नवख्या उमेदाराला उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा होत आहे. ते गेल्या काही दिवसात दयानंद उंबरजे यांच्यासोबत विविध लग्न, जयंती, नाटक उद्घाटन, वाढदिवस कार्यक्रमाला उपस्थित दाखवून स्वतःची ओळख निर्माण करत आहेत. आसिफ यत्नाळ हे जय फौंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवित आहेत. प्रशासन व विविध राजकीय क्षेत्रातील लोकांसोबात त्यांची चांगली घट्ट ओळख, हुशार, विविध विषयाचा सखोल ज्ञान अशी त्यांची प्रतिमा आहे. ते शेवटच्या क्षणी उमेदवारी भरतील अशी गावात दबक्या आवाजात चर्चा आहे.

करजगी गावात ओबीसी समाज मोठ्या प्रमाणात आहे. मुस्लिम, कुंभार, कोष्टी, नीलगार, हेळवे, माळी हे प्रमुख ओबीसी समाज असून यांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. गावात मोठ्या प्रमाणात सरकारी नोकरदार असून ते सध्या पुणे, सोलापूर आणि मुंबई सारख्या शहरात स्थायिक आहेत. गावात चांगली शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसल्याने देखील बरेचजण मुलांच्या शिक्षणासाठी सोलापूरला स्थायिक झाले आहेत. त्या मतदारांची देखील भूमिका महत्वाची ठरणार आहे.

सरपंच पदाचा उमेदवार व सदस्य पॅनल ह्या सर्व गोष्टी वर शेवटी भिस्त ठरणार आहे. गावातील मतदार राजा पुनः परतबादी व उंबरजे गटाच्या बाजूने कौल देतील कि तिसरा पर्याय शोधतील हे निवडणुकीनंतरच कळेल. पण ह्यावेळेस बिनविरोध न होता निवडणुका लागतील हे मात्र निश्चित !

**✻ सुविचार ✻**

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

## संपादकीय

### प्रयत्न करण्याची गरज..

शेती क्षेत्राला व्यवसाय म्हणून फार मोठे महत्त्व होते. शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण जनता यांना मानाचे स्थान होते. कारण खेड्यांची संख्या फार मोठी होती. मोठमोठी साम्राज्येच जणू खेड्यामध्ये दिसत होती. सर्व सोयींनीयुक्त अशी विस्तीर्ण खेडी अस्तित्वात होती. त्यावेळी शहरांची संख्या कमी होती. शहरांचा आवाकाही कमी होता. शेतीमध्ये सर्व प्रकारची पिके जमीनदार घेत होते. मर्यादित असणाऱ्या शहरांना विविध गरजांसाठी खेड्यांवर अवलंबून राहावे लागत होते. ग्रामीण भागात शेतीत काम करताना शेतकरी, शेतमजूर यांच्यात मेहनतीची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर दिसून येत होती. माध्यमांचा पुरेसा विकास झालेला नव्हता. तंत्रज्ञान फारसे आधुनिक नव्हते. त्यामुळे एकूणच खेड्यांमधील मुख्य व्यवसाय म्हणून शेतीला मोठ्या प्रमाणावर मानसन्मान होता, मोठी प्रतिष्ठा होती. कालांतराने लहान- मोठ्या नोकऱ्यांच्या मागे धावणाऱ्या तरुणांचे प्रमाण वाढू लागल्याने आणि शेकडो एकर जमीन असणाऱ्या मोठ्या शेतकऱ्याचा मुलगा शहरी भागात दोन-पाच हजारांच्या पगारावर काम करू लागला. ही प्रवृत्ती वाढत चालली. आजही शेतकरी, ग्रामीण जनता यातील बहुतेक लोक हे अशिक्षित, अडाणी आहेत असा अनेकांचा गैरसमज आहे. प्रामाणिकपणा, साधी राहणी, मनमोकळेपणाने बोलणे, माणुसकी, पाहुणचार, समोरच्याचा आदर करणे हे गुण असताना वाढत्या शहरी वातावरणाने त्यांना दुर्बल ठरविले. शहरांच्या वाढत्या साम्राज्याबरोबर हे गुण आपोआपच कमी होताना दिसतात. अशा परिस्थितीत हे गुण ज्या कुटुंबात दिसतील त्यांना समाजात प्रतिष्ठाच नाही, असा गैरसमज बहुतेक लोकांनी करून घेतला आहे. तंत्रज्ञानात फार मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली, पण त्याचा वापर शेती क्षेत्रात फारसा झालेला नाही. याव्यतिरिक्त इतर क्षेत्रात हा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला. त्यामुळे त्या क्षेत्रांची प्रगती आणि शेती व्यवसायाची अधोगती झाली. काही वर्षांपूर्वी उत्तम शेती, मध्यम यापार आणि कनिष्ठ नोकरी असे समीकरण होते. नाईलाज म्हणून लोक त्यावेळी नोकरी करीत होते.आज उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती असे समीकरण झालेले दिसून येते. आजचे तरुण हे नाइलाजाने शेती करतात. ज्यांना कितीही प्रयत्न करून नोकरी मिळत नाही ते शेवटी शेतीवर नाइलाज काम करतात. यात आपली मनोवृत्ती जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत यामध्ये फरक पडत नाही. यामध्ये बदल करण्यासाठी शहरी जनता, तरुण, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटना, शासन अशा सर्वच घटकांकडून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

## जातीवाद संपला म्हणे....

जातीवाद, विषमता, अंधश्रद्धा, थोतांड या भारतीय समाजाला लागलेल्या व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या बाबी आहेत. भारतीय विकासाची शक्ती कमकुवत करण्याचे व माणसाला माणसापासून दुर ठेवण्याचे काम या जातीच्या उतरंडीने, विषमतेने केलेले आहे. जाती धर्माचा विचार न करता केवळ माणसाने माणसाप्रमाणे राहीले आणि राष्ट्रहीत जोपासले तर भारत जगात सर्वच बाबीमध्ये शक्तीशाली बनेल. कारण भारताकडे तरुणांची ताकद, नैसर्गिक साधनसंपत्ती, भौगोलिक परिस्थिती, ज्ञान व विद्वता अशा सर्व गोष्टी आहेत की ज्या राष्ट्रहीताला अत्यंत पोषण आहे. परंतु वर्ण व्यवस्थेचे रुपांतर जातीव्यवस्थेमध्ये मध्ये करू एकाच वर्ण, जातीचे वर्चस्व कायम राहील अशीच व्यवस्था हजारो वर्षा पासुन सुरू आहे. परंतु एकाच जातीचे किंवा वर्णाचे वर्चस्व निर्माण होऊ नये म्हणून आपण लोकशाहीचा स्विकार केला व सर्वांना समान केले आणि शासकीय पातळीवर सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली. राजर्षी शाहु महाराज नेहमी म्हणायचे ज्यांनी हजारो वर्षांपासून लोकांना गुलाम बनवून विषमता व जातीव्यवस्था निर्माण केली तेच लोक भारताला स्वातंत्र्य मिळवून घेऊन स्वतः च्या हाती सत्ता केंद्रीत करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु कदापिही एकाच जातीच्या किंवा वर्णाच्या हाती सत्ता जाणे म्हणजे देशासाठी घातक असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः कडे लक्ष न देताही संविधान लिहण्याची जबाबदारी आल्याने सामाजिक जबाबदारी व मनामध्ये इमानदारी असल्याने कोणत्याही लहानातील लहान घटकांवर थोडाही अन्याय होणार नाही किंवा विकासापासून वा संधीपासुन दुर्लक्षित राहणार नाही याची काळजी घेऊन जगातील सर्वात प्रभावशाली संविधानाचे निर्माण केले व हजारो वर्षापासून चालत आलेली विषमता, अंधश्रद्धा, पाखंड, हे शासकीय पातळीवर दुर केले. परंतु त्यांची खंत होती संविधान कितीही चांगले असले तरी ते राबणारे लोक योग्य नसतील तर संविधान निरर्थक ठरेल. समता, बंधुता, न्याय, व स्वातत्र्यावर आधारित संविधान हे समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य याला ज्याचा विरोध आहे त्याच लोकांच्या हाती गेले. आणि संविधानाने जरी समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य बहाल केले असले तरीही त्याचे महत्त्व, परिणाम हे जनमानसात रुजवण्याचे काम सत्ताधारी लोकांनी केलेच नाही. उलटपक्षी विषमता व जातीवाद प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रुजवण्याचे काम त्यांच्या कडून केले जाते. ही मोठी खंत आहे. भारतीय संविधान लागु होण्या अगोदर अनेक संतानी विषमता, अंधश्रद्धा व थोतांड याविषयी प्रबोधन केले. माणसाने माणसासोबत माणुसकी ने राहण्याची शिकवण देऊन जातीयता नष्ट करण्याचे उपदेश केले. परंतु आम्ही त्यांना च जातीत बंद केले. गोरा कुंभार, सावता माळी, सेवालाल महाराज, तुकाराम महाराज, नामदेव महाराज, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज अशा संतानी विषमते विरोध प्रबोधन केले. परंतु आम्ही त्यानाच जातीत बंद करून विचार स्विकारले नाही. तुकाराम महाराज यांच्या वैचारिक तालमीत छत्रपती शिवाजी महाराज यांचे संगोपन झाले व छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेचे राज्य निर्माण करून जातीव्यवस्था मोडीत काढून मावळा ही ओळख करून देऊन विषमता वादी व्यवस्था तुडवून काढली. पुढे त्याच विचारधारेवर फुले शाहु आंबेडकर तयार झाले. संपूर्ण भारत हा फुले शाहु आंबेडकर यांच्या चळवळीला व त्यागाला जाणतो. परंतु विषमता वादी लोकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना मराठा, महात्मा फुले यांना माळी, व बाबासाहेब आंबेडकर यांना महार करून सोडले. म्हणजेच काय ज्यांचे संपूर्ण आयुष्य जाती नष्ट करण्यात गेले शेवटी त्यांनाच जातीत बंद केले. बर काही महाभाग तर छत्रपती शिवाजी महाराज यांना मराठ्यांचे माणतात पण शाहु महाराज यांना बौद्धांचे माणतात अशा वेळी त्यांच्या बुद्धीची किव येते. येथे महापुरुषांनाच जातीत बंद केले जाते तेथे लोक तोंड वर करून म्हणतात जातीवाद संपला आहे. आजही मागासवर्गीय राष्ट्रपती यांना मंदिरात प्रवेश मिळत नाही, छत्रपती घराण्यातील व्यक्तींना मंदीराच्या गाभाऱ्यात जाता येत नाही. आजही माणसाने अशुद्ध होणारे गोमुत्राने शुद्ध केले जाते तरीही जातीवाद संपला असत गृहीत धरायचे का? मंदीरातील पुजारी सर्वांना होता येत नाही, मंदीरातील पैशाचा वापर सर्वांना करता येत नाही तरीही जातीयता संपली असेच म्हणायचे का? धर्माचा व वर्णाचा माज असलेले लोक माणसाच्या अंगावर, कानात मुततात, महिलांवर बलात्कार करतात, व मुतणाऱ्याला व बलात्कार करण्यांनाचा सत्कार केला जातो, कारण ते उच्च जातीतील असतात.

खालच्या जातीवर अन्याय जरी झाला तरी वरच्या जातीतील आरोपींना वाचवण्यासाठी सर्व जन एकत्र होतात, सत्ता, संपती च्या जोरावर पिडीत व्यक्तीचा आवाज व न्याय दाबला जातो. आणि काही लोक वर तोंड करून म्हणतात जातीवाद संपला आहे. ज्यांना जातीवाद नष्ट करण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले त्या शिव फुले शाहु आंबेडकरांचे नावही यांना सहन होत नाही तरीही जातीवाद संपला असे निर्लज्जपणे म्हणणायचे म्हणजे मेंदु गहाण असल्याचे लक्षण होय. छत्रपती शिवाजीराजे महाराज, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची, पुतळ्याची व नावाची विटंबना होते आणि त्यांच्या अनुयायावर अत्याचार होतात तरीही त्यांना केवळ जातीमुळे न्याय मिळत नाही तरीही जातीवाद संपला म्हणायचे का? ज्या महामानामुळे आम्हाला सोंन्याचे दिवस आले मताधिकार, सातबारा, शिक्षण, आरक्षण, नोकरी, करण्याचे अधिकार मिळाले, थाटामाटात राहायचे, फिरण्याचे बोलण्याचे व्यवसाय करण्याचे, स्वातंत्र्य मिळाले त्या बाबासाहेब डॉ आंबेडकर यांची जयंती सहन होत नाही, त्यांचा पुतळा सहन होत नाही, त्यांचे नाव सहन होत नाही. म्हणुन जयंती साजरी करण्याऱ्यांची हत्या केली जाते. नावाच्या कमानी पाडून व लोकांवर अत्याचार करून त्यांच्या वर दबाव आणला जातो, खालच्या जातीतील लोकांना चांगले पाणी, सुखसुविधा मिळाल्याने अनेकांच्या पोटात दुखते, खालच्या जातीतील लोकांना न्यायच मिळू नाही म्हणून प्रयत्न केले जातात असे चित्र सर्वत्र असताना जातीवाद संपला असे बोलले म्हणजे केवळ वरच्या लोकांची गुलामी करणे होय. एकाच धर्मातील पण वेगवेगळ्या जातीतील तरुण तरुणींनी प्रेमविवाह केला तर ऑनर किंलीग चे प्रकरण थांबता थांबेनात. मुलीने स्वतः च्या मनाने लग्न केल्याने तिचे जिवंतपणी श्राद्ध घालणारे लोक येथेच आहेत तरीही काही लोकांना जातीवाद दिसत नसेल तर हे त्यांचे माणसिक अपंगत्व आहे. एखाद्या ठिकाणी एखाद्या समुहावर जातीय द्वेषाने अन्याय अत्याचार झाला तर अन्याय करणारे चुकीचे आहेत असे केवळ शिव फुले शाहु आंबेडकर चळवळीचे लोकच बोलु शकतात बाकीच्याचे काय? हेच नाही तर शिव फुले शाहु आंबेडकर यांच्या विचारधारेला व अनुयायांना जाती धर्माची बंधने कधीच नसतात आणि अनेक जागृत अनुयायी ते बंधने पाळतही नाही. असे अनुयायी जेव्हा बुद्ध कींवा बाबासाहेब घरात लावतात किंवा त्यांच्या विचारावर बोलतात तेव्हा त्यांचे रक्ताचे नातेवाईक त्यांना समर्थन करत नाहीत बऱ्याच प्रसंगी ते नात्यातील ओलावा कमी करतात तरीही अस म्हणायचा जातीवाद संपला. थोडक्यात काय तर जाती केवळ आम्ही माणसामध्येच बघत नाही तर महापुषांमध्ये जाती बघतो. आणि इतर जातीतील महापुरुषांचा विचार किंवा फोटो घरात आहे म्हणून त्यांच्या कडे जाणे येणे बोलणे कमी करतो तर खरचं जातीवाद संपला आहे का? हा महत्वाचा मुद्दा आहे. जातीवाद संपला आहे की नाही यावर बोलणे आवश्यक का आहे तर देशात सध्या जे अन्याय अत्याचार व बलात्कार यांचे गुन्हे घडत आहेत. आणि आरोपींना पाठीशी घातले जात आहे ते केवळ आणि केवळ जातीयवादी माणसिकतेमुळेच. म्हणून देशात शांतता, सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आणि विषमतावादी सरकार असल्याने सरकारला हेच अपेक्षित आहे कारण याचा फायदा त्यांना निवडणुकांमध्ये होतो. स्वतः च्या जातीचे वर्चस्व, अंधश्रद्धा, पाखंड, थोतांड आणि सत्ता टिकवण्यासाठी जात टिकणे महत्त्वाचे आहे. म्हणून संविधानाने जरी जात, धर्म, पंथ, वर्ण,जन्म, लिंग यावरून भेद करता येत नाही अशी अट असताना ही देशात विषमता मजबूत होत असेल तर या मागे सरकारचाही हात असतो हेच सिद्ध होते. तरीही काही लोकांना वाटते आता पहिल्या सारखे कुठ काय राहीले. आता पहिल्या पेक्षाही घातक परिस्थिती निर्माण झाली आहे. पहिले आपण किमान खर आणि स्पष्ट बोलु शकत होतो आज त्यावरही बंदी येत आहे. व वरच्या जातीतील व्यभिचारी लोकांनी चुकीचे, थोतांड, काहिही सांगितले तरी त्याला समर्थन केले तरच तो धर्माचा होतो नाहीतर विरोधक होतो. अशी परिस्थिती बघून मनात प्रश्न निर्माण होतो खरचं जातीवाद संपला म्हणे....

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा :९१३०९७९३००**

पान १ वरुन

### महाराष्ट्रासह गुजरातमध्ये पावसाचा

पातळीत पुन्हा वाढ झालीये.त्यामुळे पुन्हा दिल्ली बुडणार का? अशी चिंता दिल्लीकरांना सतावत आहे. तर तिकडे जम्मू काश्मिरच्या कुपवाडा जिल्ह्यालाही पावसाने झोडपून काढलंय. अनेक घरांना पुराच्या पाण्याचा विळखा पडला.

मध्य प्रदेशातील अनेक भागात मुसळधार पाऊस आणि पुरामुळे नागरिक त्रस्त आहेत. सिहोरमध्ये मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. सिहोरमध्ये एक कार्यक्रम सुरु असताना सोसाट्याचा वारा आणि पाऊस आला. यामध्ये १४ जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. या पावसामुळं अनेक ठिकाणी रस्त्यांना तलावाचे स्वरुप आले आहे. कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून बाधित भागातील वीज खंडित करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यात पावसामुळे पूरस्थिती निर्माण झालीये. यवतमाळच्या महागावत तालुक्यातील अनंतवाडी गावाला पुराने वेढलं. गावकऱ्यांना आता सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आलंय अनेक राज्यांना पावसाने गाठलंय पुढचे काही दिवस वादळी पावसाचे असल्याचाच अंदाज वर्तवण्यात आला आहे.कर्नाटकातही मुसळधार पाऊस आणि पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. राज्यात पूर आणि मुसळधार पावसामुळे आतापर्यंत ३२ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. राज्याचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई पूरग्रस्त भागावर लक्ष ठेवून आहेत. लोकांना दिलासा देण्यासाठी सरकारने ५०० कोटी रुपयींची मदत जाहीर केली आहे. पूरग्रस्त भागात शाळा आणि महाविद्यालये बंद करण्यात आली आहेत

### मणिपूरच्या मुद्द्यावर दोन्ही

पक्ष मणिपूरच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी जरी तयार झाले असले तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मुद्द्यावर सविस्तर स्पष्टीकरण देण्याची मागणी विरोधक करत आहेत.

पश्चिम बंगालमध्ये दोन आदिवासी महिलांची विवस्त्र धिंड काढून त्यांच्यावर अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. याच मुद्द्यावर भाजप विरोधकांना कोंडीत पकडण्याची योजना आखणार आहे. याशिवाय बिहार, छत्तीसगड, तेलंगणा आणि राजस्थानमध्ये महिला आणि दलितांवरील अत्याचाराचा मुद्दा भाजप उचलणार आहे. त्यामुळे सोमवारी संसदेत मोठा गदारोळ होण्याची शक्यता आहे.

भाजपने शुक्रवारी (२१ जुलै) रोजी तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेसची सत्ता असणाऱ्या राज्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांचा मुद्दा संसदेत उपस्थित केला. तर गुरुवार (२० जुलै) रोजी अधिवेशन सुरु झाल्यापासून विरोधक मणिपूरच्या मुद्द्यावरुन सत्ताधारी पक्षाला अनेक सवाल करत आहेत. यापूर्वी संसदेत विरोधी पक्षांकडून मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. त्यामुळे सोमवारी संसदेत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडून करण्यात येणारे आंदोलन हे अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान संसदेत आणखी कोणत्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात येईल हे देखील पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### 'तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांशी

हेतूंसाठी त्याचा गैरवापर रोखणे हे सर्वांसमोरील प्रमुख आव्हानांपैकी एक असेल. ऑनलाईन टेक्नॉलॉजीचा गैरवापर करून यूजर्सच्या मनात भीती निर्माण करू नये.

सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी विचारले, आज मी तुम्हाला दोन प्रश्न विचारू इच्छितो जे तुम्ही स्वतःला विचाराल अशी मला आशा आहे. तुमचे तंत्रज्ञान कोणत्या मूल्याचे प्रतिनिधित्व करते आणि त्याच्या शक्यता काय आहेत?

सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले की, आपण भविष्याकडे वाटचाल करत असताना विज्ञान आणि तंत्रज्ञान मानवाच्या विकासात कशी मदत करू शकतात हे पाहायला हवे. आज व्हिडीओ कॉन्फरन्सिंगमुळे आपली काम करण्याची पद्धत बदलली आहे.IIT मद्रासचे संचालक व्ही कामकोटी यांनी कार्यक्रमात सांगितले की, ६० व्या दीक्षांत समारंभात २,५७१ विद्यार्थ्यांनी पदवी पूर्ण केली आहे. त्याच वेळी, ४५३ डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे, त्यापैकी १९ परदेशी विद्यापीठांसह संयुक्त पदवी प्रदान करण्यात आली आहे. संस्थेच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष पवन गोयंका यांनी सांगितले की, येथील संशोधनावरील खर्च मागील वेळी २५० कोटी रुपयांवरून १,००० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आला आहे.

### ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना,

खाजगी कंपन्या, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, शेतकरी उत्पादक संघटना (एफपीओ) आणि कलम ८ अंतर्गत येणाऱ्या कंपन्या ज्या -डेअरी प्रक्रिया आणि मूल्यवर्धन पायाभूत सुविधा, मांस प्रक्रिया आणि मूल्यवर्धन पायाभूत सुविधा, पशुखाद्य संयंत्र, पशु जाती सुधार तंत्रज्ञान आणि जाती गुणन फार्म, पशु कचरा संपत्ती व्यवस्थापन (कृषी कचरा व्यवस्थापन) आणि पशुवैद्यकीय लस आणि औषधे उत्पादन सुविधांची स्थापना यांच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी १५००० कोटी रुपयांच्या पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी (AHIDF) च्या पंतप्रधानांच्या आत्मनिर्भर भारत अभियान प्रोत्साहन पॅकेज अंतर्गत पत हमी निधी न्यासाची स्थापना मंजूर करण्यात आली आहे.पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी योजनेच्या प्रमुख वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे ७५० कोटी रुपयांच्या पतहमी निधी न्यासाची स्थापना. पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विभागाने छ-इ संरक्षण ट्रस्टी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड च्या सोबतीने या ट्रस्टची स्थापना केली आहे. नाबार्डची पूर्ण मालकी असलेल्या ही उपकंपनी पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी (AHIDF) योजनेंतर्गत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना पतहमी योजनेचा विस्तार करणाऱ्या या न्यासाच्या स्थापनेसाठी तयार करण्यात आली आहे. मार्च २०२१ मध्ये स्थापन झालेला हा निधी न्यास कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी (AHIDF) च्या पतहमी योजनेंतर्गत देशातील पहिला फंड न्यास असून पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विभागाने (DAHD) हाती घेतलेला एक महत्त्वाचा उपक्रम आहे, ज्यामुळे पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी (AHIDF) चा लाभ मिळवणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग केंद्रांची संख्या झपाट्याने वाढू आणि बँकांकडून विणातारण कर्ज मिळवण्यासाठीची व्यवस्था मजबूत होईल.

३% व्याज दराची सवलत देणार असून, कोणत्याही शेड्यूल्ड बँक, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) यांच्याकडून एकूण प्रकल्प खर्चाच्या ९०% पर्यंत कर्ज देण्याची सुविधा पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी (AHIDF) योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये मार्फत देण्यात येणार आहे.अधिक जाणून घेण्यासाठी, या संकेतस्थळाला भेट द्या: https://dahd.nic.in/ Am{U https://ahidf.udyamimitra.in/

## पूरबाधित कुटुंबांना एक महिन्याचे राशन देण्याचे मदत पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांचे निर्देश

बुलडाणा : संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यात गेल्या दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित कुटुंबाचे प्राधान्याने पुनर्वसन करीत या कुटुंबांना एक महिना पुरेल एवढे राशन तातडीने पुरविण्यात यावे, असे निर्देश मदत पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी दिले.शेगाव येथील विश्रामगृहात आज श्री. पाटील यांनी जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक आपत्तीबाबत आढावा घेतला. यावेळी आमदार राजेश एकडे, विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडे, जिल्हाधिकारी डॉ. ह. पि. तुम्मोड, मुख्य कार्यकारी अधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने आदी उपस्थित होते.



श्री. पाटील म्हणाले, पुराचे पाणी घरात शिरले आहे, अशा कुटुंबांना मदतीसोबत एक महिना पुरेल एवढे राशन देण्यात यावे. तसेच पुरामुळे मृत्यू झाला असल्यास तातडीने सानुग्रह अनुदान देण्यात यावे. पुरामुळे गावातील विहिरीत गाळपाणी गेले आहे आणि त्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, अशा ठिकाणी अधिकाऱ्यांनी चांगले पाणी उपलब्ध असलेल्या विहिरी तात्काळ अधिग्रहित करून पाणीपुरवठा करावा. दूषित पाणीपुरवठा झाल्यास आरोग्याची समस्या निर्माण होते. त्यामुळे पावसाळ्यात आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी.पुरामुळे संपर्क तुटलेल्या गावातील कुटुंबांना एक महिना पुरेल एवढे धान्य आणि सानुग्रह अनुदान देण्यात यावे. तसेच पुरामुळे बाधित आणि बिघर झालेल्या कुटुंबांची सुरक्षित ठिकाणी व्यवस्था करण्यात यावी. त्यांना तातडीने सानुग्रह अनुदान देण्यात यावे. अतिवृष्टीमुळे जमीन खरडून गेल्यामुळे पिक, फळबागा आणि बुजलेल्या विहिरींचे तातडीने पंचनामे करावेत.पुरामुळे महावितरणचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या ठिकाणाची तातडीने दुरुस्ती करून वीजपुरवठा तातडीने सुरळीत करावा. तसेच महसूल मंडळामध्ये ६५ मिलिमीटरहून अधिक पाऊस झालेला असल्यास तेथील सरसकट पंचनामे करण्यात यावे. जिगाव प्रकल्पाच्या पाण्यामुळे नुकसानीची माहिती घेण्याच्या सूचना त्यांनी जिल्हा प्रशासनास दिल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सरकार खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठिशी : कृषिमंत्री धनंजय मुंडे

बीड : कमी पावसात दमट हवामानामुळे गोगलगायीची समस्या निर्माण झाली आहे यामुळे बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, याचे लवकरात लवकर पंचनामे करावे व नियमानुसार पुढील प्रक्रिया करावी, असे निर्देश देत शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे, असे प्रतिपादन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज परळी येथे केले.

कृषिमंत्री मुंडे यांनी आज परळी तालुक्यातील वाघबेट आणि वेळब गावात प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली व शेतकऱ्यांची संवाद साधला यावेळी बीड जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या समवेत पाहणीस हजर होत्या.याबाबतच्या उपाययोजना कशाप्रकारे करता येतील आणि नुकसान झालेल्या भागातील पंचनामे लवकर होतील या संदर्भात कृषीमंत्री यांनी दूरध्वनीद्वारे मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांच्याशी संपर्क साधला व त्या स्वरूपाचे प्रस्ताव आजच कृषी विभागाने तयार करून मंत्रालयास पाठवावे असे निर्देश स्थानिक अधिकाऱ्यांना दिले.

याआधी देखील बीड जिल्ह्याचा काही भाग तसेच उस्मानाबाद आणि नांदेडमध्ये अशा प्रकारचा गोगलगायींचा प्रादूर्भाव झाला होता त्यावेळी शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून त्यांना शासन स्तरावरून मदत करण्यात आली होती त्याच पद्धतीने याबाबतीत काम करावे लागेल असे श्री. मुंडे म्हणाले.शेतकऱ्यांना या संकटाचा मुकाबला करण्यासाठी तातडीने स्थानिक स्तरावर औषधी खरेदी करण्यासंदर्भात यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. नियोजन निधी मधील कृषी विभागाच्या रकमेतून ही खरेदी शक्य आहे त्यामुळे शेतकऱ्यांना त्वरित दिलासा मिळण्याच्या दृष्टिकोनातून अधिकाऱ्यांनी काम करावे असे कृषिमंत्री यावेळी म्हणाले.



तर कारवाई करू पीक विम्यासाठी शेतकऱ्यांकडून ज्यादा पैसे घेतले जात आहेत अशा स्वरूपाची लिखित तक्रार आल्यास त्या संदर्भात निश्चितपणे कार्यवाही करून व दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल असे कृषिमंत्र्यांनी पत्रकारांशी यावेळी बोलताना सांगितले.

यंदा पावसाने ओढ दिली आणि पावसाला विलंब झालेला आहे तसेच मागील वर्षाच्या तुलने पावसाचे प्रमाण अत्यल्प असे आहे, मात्र २५ तारखेला नंतर त्यात फरक पडेल अशी शक्यता असल्याने येणाऱ्या काळात पाऊस सुरू होईल असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात यावेळी सांगितले.या दौऱ्यात कृषी विभागाचे तसेच महसूल विभागाचे अधिकारी सामील झाले होते. आज दौऱ्याला प्रारंभ करण्यापूर्वी कृषिमंत्री मुंडे यांनी येथील ज्योतिर्लिंग वैद्यनाथाचे दर्शन घेतले.संवेदनशील कृषी मंत्री बीड जिल्ह्यात झालेला कमी पाऊस आणि शेतकऱ्यांच्या अडचणी तसेच नुकत्याच घडलेल्या इर्शाळगड येथील दुर्घटनेमुळे सर्वांचे स्वागत नाकारत स्वागत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आपली संवेदनशीलता दाखवून दिली.

# पंचप्पा कल्याणशेट्टी यांचे आठवे पुण्यस्मरण विविध उपक्रमानीं साजरी

अक्कलकोट/प्रतिनिधीः सौ.सुरेखा कल्याणशेट्टी माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गिरजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र,नालंदा विद्यार्थी वसतिगृह यांच्या वतीने संस्थापक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी सर यांचे आठवे पुण्यस्मरण विविध उपक्रमानीं साजरी करण्यात आली. यावेळी जेष्ठ संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी,संचालक मल्लिनाथ मसुती, सीईओ सौ रूपाली शहा, सौ पूनम कोकळगी माजी मुख्याध्यापक बापुजी निंबाळकर ,प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी हे उपस्थित होते. सर्व उपस्थितांकडून



कै पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कु श्रध्दा मोरे,स्फुर्ती खराडे,खंडेराव घाटगे बापुजी निंबाळकर यांनी कै पंचप्पा कल्याणशेट्टीसर यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले.यावेळी आठव्या पुण्यस्मरणा निमित्त मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच चित्रकला, रांगोळी व मातीकाम (हस्तकला) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेस विदयार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. यावेळी पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण, प्राथमिक मुख्याध्यापक सुरेश आवटे, निखिल भालेराव, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी,पालक व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भाजपा अक्कलकोट वतीने पंचप्पा कल्याणशेट्टी यांचे पुण्यतिथीनिमित्त फळ वाटप

अक्कलकोट/प्रतिनिधीः भारतीय जनता पक्ष अक्कलकोट यांच्या वतीने शिक्षण महर्षी कै पंचप्पा कल्याणशेट्टी सर यांचे पुण्यतिथी निमीत्त पार्टी कार्यालय येथे प्रतिमा पूजन जेष्ठ नेते मल्लिनाथ स्वामी व शहराध्यक्ष शिवशरण जोजन यांच्या हस्ते पक्ष कार्यालयात पार पडले,त्यानंतर ग्रामीण रुग्णालय येथे रूग्णांना फळवाटप व शेख नुरदिन दर्गा , स्वामी समर्थ समाधी मठ येथे सुध्दा भक्तांना फळवाटप करण्यात आले, यावेळी तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, निजप्पा गायकवाड, रमेश कापसे, महेश हिंडोळे, यशवंत धोंगडे सुनील गवंडी,नन्नू कोरबू,रझाक सय्यद ऋषी लोणारी , राहूल ढोबळे प्रभाकर मजगे ,दयानंद बिडवे, अप्पू बिराजदार नमीद डांगे, अंकुश चौगुले, अविनाश मडिंखाबे,राहूल वाडे राजू थंब,रशिद खिस्तके व पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रल्हाद पा. कराड(दादा) यांचे कार्य प्रत्येकांसाठी प्रेरणादायी : रतन पा.वडघुले

निफाड /राजेंद्र थोरात : प्रल्हाद पा कराड ( दादासाहेब) म्हणजे कष्टकरी शेतकरी बैलांच्या नांगरापासून ते ट्रॅक्टर पर्यंत आधुनिक शेती करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले ,अवघी सातवी शिकलेले दादा परंतु तज्ञ अशा इंजिनीयर, शास्त्रज्ञ, यांना लाजवेल असे ज्ञान त्यांच्याजवळ होते,त्यांचे कार्यकर्तृत्व प्रत्येकाला मार्गदर्शक असून त्यांचे कार्य शब्दात मांडणे हे कठीण काम आहे असे प्रतिपादन न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे सचिव रतन पा वडघुले यांनी केले.

संघर्षाच्या वाटेवरील प्रवासी, शेतकरी संघटनेचे नेते निफाड, सह. साखर कारखान्याचे मा. अध्यक्ष, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक ,क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक विश्वस्त कै. प्रल्हाद पा. कराड( दादा.) यांचे दुःखद निधन झाले. त्यांचे शोक संदेश सभेचे आयोजन व वैनतेय विद्यालयाचे सभागृहात करण्यात आले होते,

याप्रसंगी. न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा व्यवहारे. निफाड चे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र डोखळे ,आमदार. नरेंद्र दराडे , मुंबईचे सेवानिवृत्त डिशनल कमिशनर डी.पी आव्हाड, निफाड चे माजी नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार, जिल्हा दूध संघाचे माजी अध्यक्ष शिवाजी ढेपले, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष मधुकर शेलार ,कवी विवेक उगलमुगले कादवा सह.साखर कारखान्याचे संचालक सुनील केदार. आदी मान्यवर उपस्थित होते,

याप्रसंगी वडघुले म्हणाले की दादांची शेतकऱ्यांविषयीची तळमळ होती त्यांच्यात एक शास्त्रज्ञ आम्ही



अनुभवला असून त्यांचे कार्य प्रत्येकाला प्रेरणादायी आहे, ज्यांचा जसा अनुभव असेल त्यांनी त्याच शब्दात लिखाण करून त्यावर एक चांगलं पुस्तक तयार करण्यात येणार असल्याचे वडघुले यांनी यावेळी सांगितले

यावेळी पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती जगन कुटे, नाईक एज्युकेशन संस्थेचे संचालक दिगंबर गीते, ई.के.कांगणे, ऍड. अशोक निकम, करंजगाव चे माजी सरपंच खंडू पा.बोडके, नगरसेवक सागर कुंदे, निफाड वकील संघाचे अध्यक्ष ऍड. प्रवीण ठाकरे, संजय गाजरे, तसेच विविध संघटना चे कार्यकर्ते महिला /पुरुष तसेच वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य एम एस माळी .पर्यवेक्षक पल्लवी सानप. वैनतेय शिशुविहार च्या मुख्याध्यापिका प्रसन्ना कुलकर्णी नंदकुमार वडघुले.आदी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्य कर्तुत्वा विषयी भावना व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली समर्पित केली , वैनते विद्यालयाचे उपप्राचार्य . बी.के.ठोके यांनी पसायदान घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# दुधनी येथे प्रशांतकुमार पांडेय यांच्या रेल्वे प्रशासनाचा बदली झाल्याने क्षत्रिय रेल्वे कर्मचाऱ्यांकडून त्यांचे सत्कार संपन्न



अक्कलकोट/प्रतिनिधीः मध्ये रेल्वे दुधनी येथे प्रबंधक म्हणून प्रशांतकुमार पांडेय हे गेल्या पाच वर्षा पासून कार्यरत होता त्यांचा अचानक मध्य रेल्वे प्रशासनाच्या वतीने वाराणसी येथे बदली झाली आहे. त्यांच्या निरोप समारंभ आयोजित केली होती.ह्यात पांडेय यांच्या या भागातील कर्मचार्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे.

दुधनी रेल्वे स्टेशन येथील दालनात प्रशांतकुमार पांडेय यांच्या सत्कार समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी सोलापूर व कलबुर्गी विभागातील कर्मचारीही या प्रसंगी उपस्थित राहून कर्मचारी यांच्या वतीनेही त्यांचा सत्कार करण्यात आली आहे.

यावेळी मध्य रेल्वे चे सी एस् कुलकर्णी(T I),दुधनी स्टेशन अधिक्षक रामराज मीणा,स्टेशन प्रबंधक लिंगराज कांदे, बुकिंग सुप्रवायजर वेलु केशवन, ए ड चसंदीप यादव,रिपाइं जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी, दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी यांनी प्रशांतकुमार पांडेय यांच्या पाच वर्षाच्या कालावधीत प्रामाणीक व निष्ठेने काम करुन दुधनीकरांचे मन जिंकले असून ते सर्वांचे मनात घर करुन बसल्याचे कौतुक उपस्थित मान्यवर करत होते.

याप्रसंगी,दुधनी मध्यरेल्वेचे कुलकर्णी साहेब, रामराज कांदे, लक्कप्पा परमगोळ, वेलु केशवन, रिपाइं चे सैदप्पा झळकी,गोरखनाथ धोडमनी, महेदिमिया जिडगे, विजयकुमार धोडमनी सह रेल्वे कर्मचारी शब्बीर पटेल, लक्कप्पा परमगोळ, इरण्णा ओगै,बिरप्पा पुजारी, सोमशंकर शिंगे, यल्लप्पा पुजारी, गौतम शिंगे आदि कर्मचारी सह विजयकुमार धोडमनी, एकनारथ मोसलगी,गुरु गंगावती,नागप्पा परमगोळ, ज्ञानेश्वर जाधव, सद्दाम शेख, मल्लीनाथ मदरी, शिवयोगी ठक्का,मिलींद मुळे, सिध्दाराम बिल्लाड,भिमा यड्रामी, सिध्दाराम सावळगी,खाजप्पा लोड्डे आदि सह इतर मान्यवर उपस्थित होते.

# शिक्षणमहर्षी पंचप्पा कल्याणशेट्टी यांचा ८ वा स्मृतिदिन साजरा


अक्कलकोट/प्रतिनिधीः महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पंचप्पा कल्याणशेट्टी सर यांचा ८वा स्मृतिदिन हन्नूर येथील अनंत चैतन्य माध्य. व उच्च माध्यमिक प्रशालेत विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. प्रारंभी प्रशालेचे माजी मुख्याध्यापक व मार्गदर्शक माननीय श्री.सिद्धप्पा कल्याणशेट्टी सर यांच्या हस्ते कै. पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यानंतर प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.अशोक साखरे सर यांनी मरावे परि किर्ती रूपी उरावे यासम जीवन व्यतीत केलेल्या कै.सरांच्या स्मृतीला वंदन करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला. कै. सरांचा वृक्षलागवड व संवर्धन यावर सतत भर असायचा याकरिता आजच्या त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रशालेच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे सन्माननीय श्री.सिद्धप्पा कल्याणशेट्टी सर व प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. विलास बिराजदार व जेष्ठ शिक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे , लिपिक श्री. अब्दुल करीम मुल्ला,शिक्षिका सौ.मृदुलादेवी स्वामी यांच्या हस्ते

वृक्षलागवड करण्यात आले.व यानिमित्ताने रांगोळी, चित्रकला, कथाकथन, निबंध अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.व उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात



आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रशालेचे सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख श्री.अप्पासाहेब काळे यांनी केले.तर आभार सांस्कृतिक कार्यक्रम विभाग सहाय्यिका सौ. मल्लम्मा चप्पळगाव मॅडम यांनी मानले. यावेळी समस्त शिक्षक बंधु-भगिनी,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## शब्दकोडे क्र ६८



आडवे शब्द १.महाराष्ट्र राज्य मार्ग ----- महामंडळ म्हणजे एस.टी. ५.स्वादीष्ट,रूचकर ७.भांडकुदळ,भांडणारा ८.भारी,वजन असलेला ११.पलंग,शेज १२.वधु सोबत असलेली बहीण किंवा मुलगी १३.अजय देवगण-तब्बु यांचा एक चित्रपट,कथा,गोष्ट हिंदीत १४.बगल १६.रोकड देऊन,रोख १७.स्वयंपाकघरातील एक काचेचे किंवा चिनी मातीचे भांडे १८.सप्तपातळापैकी एक २१.कवाली गाणारा २२.रोगउपचार २३.फुलांचा हार,स्त्रीया वेणीत खोचतात तो २४.विदयुत,विज २६.अमसुल किंवा त्याचे झाड २७.डोळयात घालावयाचे काजळ हिंदीत २८.लहान कोयता २९.वाट,पथ ३०.डोंगराची तुटलेली कपार ३१.जहाल विरूद्ध ३३.हिंदीत कांदा ३४.विपुल,भरपुर ३६.पती,धनी ३७.गळ,आकडा ३८.दरवाजा,द्वार ३९.सैन्य,दल ४१.मोठेपणा,महानता ४३.कामना,इच्छा ४५.उसाच्या रसाची दुकान ४७.गाण्याचा सराव ४९.बशीचा जोडीदार ५०.थोडेसे करपलेले ५३.प्रत्येक,भाव ५४.ऐसपैस मांडी मारून बसने ५६.एक गोड व आंबट फळ ५८.एकटा,सांमर्जन ५९.नसती कुरापत ६३.मीन,मत्स्य ६४.इजिप्त मधील प्रसिद्ध नदी ६६.भरभराट,सुबत्ता ६८.टपालाने त्वरीत संदेश पाठवण्याची एक पद्धत ६९.रंगाने काळा नसलेला ७१.घसारा,झीज ७२.शत्रु मागे लागला म्हणजे पळणारांना जमीन पुरत नाही या अर्थी एक म्हण ७३.आकाशात उंच उडणारा पक्षी

उभे शब्द १.रस्त्यावरील कर,जकात २.वरकरणी,बाहेरून ३.नविन,नवा,नुतन ४.हिंदीत प्राण,जीव ६.राम तेरी गंगा मैली चित्रपटाची नायिका ७.कारस्थान,कावा ९.एक भारतीय क्रिकेटपटु'----- श्रीनाथ' १०.मोठया भावाला हाक मारावयाचा एक शब्द ११.विश्वास,भरवसा १३.मृग,काळवीटाच्या जातीचा एक प्राणी १४.सापाने टाकलेली त्वचा १५.'उथळ पाण्याला ----- फार'एक म्हण १६.पलंग विणण्याची कापडी पट्टी १७.सुक्या मेव्यातील एक फळ १९.शेतीलवरील कर,समस्त २०.पत्यातील एक खेळ २२.गरज,आवश्यकता २३.विष,जहर २४.बायको,भार्या २५.कमळ,राजीव २६.शुष्कता,कोरडेपणा २७.चांगला वास,सुगंध ३०.धोंडा,पत्थर,खडा ३२.पलीकडील तिराला,त्या किनाऱ्याला ३३.तहान हिंदीत ३४.निघालेला,मार्गस्थ ३५.भात शिजताना होणारा आवाज ३६.महीना,मास ३७.घटस्फोट,काडीमोड३८.व्यायाम,जोर ४०.सोन्याची परीक्षा,अर्क ४१.बुद्धी ४२.वादयांचा मोठा आवाज ४४.शुर,योद्धा ४६.नमन,नमस्कार ४८.श्रीकृष्णाचे कुळ ५०.झोक,हिंदीत उदया ५१.प्रभात,सकाळ ५२.यातना,तसदी,कष्ट ५४.झाडू,केरसूणी५५.मिळकत,आय ५६.शर्त,पैज ५७.अलंकार शास्त्रात वर्णीलेले नऊ रस ५८.एक पांढरा भित्रा प्राणी ६०.अर्ध्या ओंजळीचे माप ६१.पडणे,नाश ६२.आठवडयातील रविवारनंतरचा वार ६३.आईची बहीण ६४.श्रीफळ ६५.भूगोल उलटे करा ६६.पाहणे ६७.करडया रंगाचा ६८.ज्वर ७०.एकदम छोटी वस्तू, '-- चा पर्वत करणे' एक म्हण

# 'गृहनिर्माण संस्था मतदार नोंदणी अभियाना'चा शुभारंभ

## गृहनिर्माण संस्थांमध्ये १०० टक्के मतदार नोंदणीसाठी सदस्यांनी पुढे यावे : मुख्य निवडणूक अधिकारी



पुणे : निवडणूक प्रक्रियेविषयी असणारी उदासीनता दूर करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांमधील सदस्यांनी सहकार्य करावे आणि पुणे जिल्हा मतदान प्रक्रिया व हक्कांबद्दल जागरूक आहे हे दाखवून द्यावे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कर्तव्यभावनेने सुटीच्या दिवशी आपल्याकडे मतदार नोंदणीसाठी येत असताना त्यांना प्रतिसाद देऊन १०० टक्के मतदार नोंदणी करून अभियान यशस्वी करावे, असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले.हिंजवडी येथील ब्लू रिज गृहनिर्माण संस्था येथे जिल्ह्यातील गृहनिर्माण संस्थांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या मतदारांची १०० टक्के मतदार नोंदणी करण्यासाठी जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे आयोजित 'गृहनिर्माण सोसायटी मतदार नोंदणी अभियाना'च्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, उपजिल्हाधिकारी अर्चना तांबे, उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे, तहसीलदार रणजित भोसले, ब्लू रिज गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन राजेंद्र कुमार, सचिव पांडुरंग पाटील आदी उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी श्री.देशपांडे म्हणाले, देश जेव्हा प्रतिकूल परिस्थितीतून किंवा वेगळ्या स्थित्यंतरातून जात असताना मतदारांची भूमिका महत्त्वाची असते. लोकशाही प्रक्रियेत सर्वसमावेशकता आणि मतदारांचा सहभाग असल्यास लोकशाही यशस्वी ठरते. त्यासाठी मतदार याद्यांचे शुद्धीकरण आवश्यक आहे. देशाचे भवितव्य तरुणांच्या हातात असताना केवळ १३ टक्के युवा मतदारांची नोंदणी झाली आहे. हे चित्र बदलण्याची गरज आहे.

मतदारांनी निवडणूक आयोगाचे प आणि संकेतस्थळाचा वापर करून मतदार यादीतील नाव तपासून घ्यावे. २१ ऑगस्ट पर्यंत चालणाऱ्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाचा लाभ घेत नागरिकांनी या प्रक्रियेत सहभाग घ्यावा. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हा निवडणूक प्रक्रियेचा कणा आहे त्यांच्या प्रयत्नांना गृहनिर्माण संस्थांच्या सदस्यांनी साथ द्यावी आणि राज्य व देशाला मार्गदर्शक काम पुणे जिल्ह्याने करून दाखवावे, असेही आवाहन त्यांनी केले.

भारतातील पहिली निवडणूक १९५२ मध्ये घेण्यात आली. त्यावेळी देशात ही लोकशाही पद्धत टिकणार नाही असे भाकीत करण्यात आले. मात्र हे खोटे ठरवत भारतीय नागरिकांनी एकत्रितपणे निवडणूक प्रक्रिया यशस्वी करून दाखवली. देशातील लोकशाही प्रक्रियेच्या यशस्वी प्रवासावर आधारित ५ भागांची निवडणूक प्रक्रियेचे यश सांगणारी मालिका लवकरच दूरचित्रवाणी वाहिनीवर प्रदर्शित करण्यात येणार आहे, असेही श्री.देशपांडे म्हणाले.

जिल्हाधिकारी डॉ.देशमुख म्हणाले, भारतीय लोकशाही बळकट करण्यात भारत निवडणूक आयोगाची भूमिका महत्त्वाची आहे. आयोगाने निवडणूक प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून अनेक सुधारणा केल्या आहेत. निवडणूक पारदर्शकपणे घेण्यासोबत आता सर्वसमावेशक मतदार यादी तयार करण्यावर तसेच निवडणुका मतदारांच्यादृष्टीने सुविधाजनक होतील यावर भर देण्यात येत आहे.

मतदार याद्यांचे शुद्धीकरण करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्याच्या मतदार यादीत मोठ्या संख्येने युवा मतदारांना अद्याप नोंदणी करण्याची संधी आहे. निवडणूक प्रक्रियेत सुशिक्षित नागरिकांची भूमिका मार्गदर्शक असावी आणि त्यांनी मतदान प्रक्रियेत पुढाकार घेण्याची गरज आहे. त्यादृष्टीने मतदार नोंदणीकरिता नागरिकांना प्रोत्साहित करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

संस्थेचे सचिव श्री.पाटील यांनीही यावेळी विचार व्यक्त केले. प्रशासनाने मतदार नोंदणीसाठी घेतलेला पुढाकार स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.कचरे यांनी केले. मतदार नोंदणीसाठी ब्लु रिज सोसायटीने चांगले सहकार्य केल्याचे सांगून त्यांनी नागरिकांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन केले. मुख्य निवडणूक अधिकारी श्री.देशपांडे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात छायाचित्र मतदार ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले आणि मतदार नोंदणी अर्ज स्वीकारून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हाभरातील १ हजार १६८ गृहनिर्माण संस्थांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे.

# विधिमंडळात चर्चा होऊन सुद्धा सोलापूर ग्रामीण भागात हातभट्टी दारू राजरोसपणे सुरूच..

वेळापूर/प्रतिनिधी : सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेत सोलापूर च्या देशी दारू आणि अवैध हातभट्टी दारूचा विषय चांगलाच गाजला आहे. या विषयावर माळशिरस चे आमदार राम सातपुते यांनी आक्रमक होऊन सरकारला त्यांनी जिल्ह्या सहित माळशिरस तालक्यातील अवैध दारू दुकाने, हातभट्टी व देशी दारू बंद करण्याची मागणी केली. मात्र सभागृहात यावर चर्चा होऊनसुद्धा माळशिरस तालक्यातील वेळापूर याठिकाणी अवैध दारूची दुकाने खुलेआम सुरू असल्याचे दिसत आहे.सदर ठिकाण हे वेळापूर बस स्टँडच्या पाठीमागील बाजूस आहे. या दारू दुकानाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळत असते. दिवसभर प्रवासी, महिला आणि शालेय मुलांची ये जा सुरू असते. ज्याठिकाणी ही दारू विकली जाते तेथून वेळापूर पोलीस स्टेशन हाकेच्या अंतरावर आहे. या रस्त्यावरून पोलिसांची ही नेहमी ये जा सुरू असते तरी सुद्धा ही अवैध ठिकाणे त्यांच्या निदर्शनास का येत नाहीत? अशी परिसरात चर्चा सुरू आहे. वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीत असणाऱ्या सर्वच गावांमधे अशाप्रकारे अवैध देशी दारू व हातभट्टी दारूची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू आहे. मात्र यावर संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरू असते. दरम्यान ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात ही दुकाने सुरू आहेत त्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी सभागृहात करण्यात आली आहे. त्यामुळे वेळापूर परिसरात सुरू असणाऱ्या दुकानांवर सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# देशातील पहिलं खासगी हिल स्टेशन लवासाची १,८१४ कोटींना विक्री

पुणे: पुण्यातील प्रसिद्ध असलेलं आणि खासगी हिल स्टेशन असलेलं लवासा विकलं गेलं आहे. दिवाळखोरी रिझोल्यूशन प्रक्रिया सुरू केल्यानंतर सुमारे ५ वर्षांनी, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NCLT) ने त्यास मान्यता दिली आहे. नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (NCLT) ने शुक्रवारी दिवाळखोर लवासा कॉर्पोरेशनची डार्विन प्लॅटफॉर्म इन्फ्रास्ट्रक्चरला विक्री करण्यास मान्यता दिली आहे. NCLT च्या मान्यतेने, नवीन विकासक, डार्विन प्लॅटफॉर्म इन्फ्रास्ट्रक्चर, आता या प्रकल्पात पुढे जाऊ शकतात, जे हजारो घर खरेदीदारांना त्यांच्या मालमत्तेच्या चाव्या मिळण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत त्यांच्यासाठी आशा निर्माण झाली आहे.



दिवाळखोरी संहिता अंतर्गत दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेसाठी NCLT ने ऑगस्ट २०१८ मध्ये, ऋउउ ची रिअल इस्टेट कंपनी लवासा कॉर्पोरेशनच्या कर्जदारांची याचिका स्वीकारली आहे.

लवासाला प्रमुख कर्ज देणाऱ्यांमध्ये युनियन बँक ऑफ इंडिया, एल अँड टी फायनान्स, आर्सिल, बँक ऑफ इंडिया आणि ॲक्सिस बँक यांचा समावेश आहे.डिसेंबर २०२१ मध्ये, डार्विन प्लॅटफॉर्म इन्फ्रास्ट्रक्चरने सादर केलेल्या संकल्प योजनेला कमिटी ऑफ क्रेडिटर्स (CoC) कडून जबरदस्त ९६.४१ टक्के मंजुरी मिळाली. मात्र आत्तापर्यंत ही योजना खटल्याच्या अधीन होती. न्यायाधिकरणाने डार्विन प्लॅटफॉर्म इन्फ्रास्ट्रक्चर (उ्झखङ) द्वारे सादर केलेल्या रिझोल्यूशन प्लॅनचे काळजीपूर्वक परीक्षण केले आणि असा निष्कर्ष काढला की ते नियमांखालील सर्व आवश्यकतांचे पूर्णपणे पालन करते. रिझोल्यूशन प्रोफेशनलच्या मते, प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १२,५०० एकर क्षेत्राचा विस्तार आहे, १८ गावांमध्ये पसरलेला आहे आणि पूर्ण होण्यासाठी सुमारे ८ ते १० वर्षे लागतील असा अंदाज आहे.

पुण्यापासून सुमारे ६० किमी अंतरावर असलेल्या लवासा हील सिटीची कल्पना इटलीतील शहरासारखी आहे. याचं वर्णन नयनरम्य नंदनवन म्हणून करण्यात आली होती. देशातील पहिले खाजगीरित्या बांधलेले आणि व्यवस्थापित केलेले शहर असल्याने भारतातील हा एक मोठा उपक्रम होता. अनेक शहरी पर्यटकांच्या आवडीचं ठिकाण बनलं. डोंगर दऱ्यांमध्ये वसलेले हे लवासा अनेक पर्यटकांना अजूनही आकर्षित करते. पुण्यापासून जवळ असल्याने पर्यटकांसाठी लाँग ड्राईव्हसाठीचा हा उत्तम पर्याय आहे. त्यामुळे अनेक पर्यटक अजूनही लवासा शहराला भेट देताना दिसतात.

# गारपीट व अवकाळीची नुकसानभरपाई मिळावी; आ.मोहिते–पाटील यांची विधानपरिषदेत मागणी

अकलूज/प्रतिनिधी : मार्च, एप्रिल व मे २०२३ या महिन्यांमध्ये वादळी वारे, गारपीट, अवकाळी पावसाने राज्यासहीत सोलापूर जिल्ह्याला झोडपले होते. राज्यातील शेतकऱ्यांचे १ लाख ९९ हजार ४८६ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते तर सोलापूर जिल्ह्यामध्ये ३ हजार ७८५ हेक्टर वरील शेतीपिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ताबडतोब आर्थिक मोबदला मिळावा या संदर्भात आमदार रणजितसिंह मोहिते–पाटील यांनी विधानपरिषदेत सरकारकडे मागणी केली. वादळी वारे, अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे जिल्ह्यात करमाळा, माढा, माळशिरस, अक्कलकोट, पंढरपूरसह काही तालुक्यात ३ व्यक्ती व ६२ जनावरे मयत झाली. अंशत: घरांची पडझड ३९२, नष्ट झालेल्या झोपड्या २०, जनावरांचा गोठा ६ व ३ हजार ७८५ हेक्टर शेतीचे नुकसान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने संकलित केली होती. त्यानुसार ७ कोटी ७० लाख १४ हजार ६८० रूपयांचे अनुदान शासन स्तरावर प्रस्तावित होते. या अवकाळी पावसामुळे व वादळी वाऱ्यामुळे कडधान्य, फळपिके व भाजीपाला आदींचे व मालमत्तांचे नुकसान झाले. गारपिटीमुळे विविध भागातील जनावरे दगावणे, पावसामुळे शेतजमिनीची प्रचंड धूप होऊन बांध बंदिस्ती अनेक ठिकाणी वाहून गेल्याचे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते.



त्यांना तत्काळ मदत मिळणे गरजेचे असल्याचे मोहितेपाटील यांनी सभागृहात स्पष्ट केले. त्यावर मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी बाधितांना लवकरात लवकर नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे सांगितले. यावेळी सभागृहात झालेल्या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार रमेश कराड, प्रवीण दटके, उमा खापरे व अन्य सदस्य सहभागी झाले होते.



## इलंदा कांबळे यांचे दुःखद निधन

सोलापूरः आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, सकाळ वृत्तपत्रकाचे माजी मुख्य संपादक ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या मातोश्री श्रीमती. इलंदा मारुती कांबळे यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी दुःखद निधन झाले.रक्षा विसर्जन विधीचा कार्यक्रम आज सकाळी ०९.०० वाजता ठेवण्यात आले आहे.

# नागपुरातील व्यापाऱ्याला ऑनलाईन गेमच्या माध्यमातून ५८ कोटींचा गंडा;

## आरोपीच्या घरातून १८ कोटींची रोकड, १५ किलो सोनं जप्त



नागपूर : नागपुरात ऑनलाईन गेमच्या माध्यमातून एका व्यापाऱ्याची तब्बल ५८ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणातील आरोप हा गोंदियातील आहे. अनंत जैन असं आरोपीचं नाव असून तो फरार झाला. महत्त्वाची बाब म्हणजे पोलिसांनी अनंत जैनच्या गोंदियातील घरी छापा घातल्यानंतर कोट्यवधींची रोख रक्कम जप्त केली आहे. अनंत जैनच्या घरातून आतापर्यंत जवळपास १८ कोटी रुपयांची रोख रक्कम, १५ किलो सोनं आणि २० किलो चांदी जप्त करण्यात आली आहे. आरोपी हा क्रिकेट सट्टेबाज आहे. नागपूरच्या इतिहासातील ऑनलाईन फसवणुकीची ही सर्वात मोठी घटना आहे.

नोव्हेंबर २०२१ पासून ही फसवणूक सुरु होती. तक्रारदार व्यापारी व्यवसायाच्या निमित्त आरोपीच्या संपर्कात आला होता. त्यामुळे दोघांचा परिचय होता. आरोपीने ऑनलाईन गेमिंगमध्ये मोठ्या प्रमाणात पैसा असल्याची बतावणी केली. आरोपीने फिर्यादीला एक लिंक पाठवून त्यावर रम्मी, कॅसिनो आणि तीनपत्ती या ऑनलाईन गेमच्या माध्यमातून पैसे जिंकण्याचे आमिष दाखवले दाखवले. आधी व्यापाऱ्याने त्यास नकार दिला. मात्र, आरोपीने जास्तच आग्रह केल्याने व्यापारी तयार झाला. आरोपीने व्यापाऱ्याला 'डायमंड एक्सचेंज डॉट कॉम' या लिंक पाठवून त्याचं लॉगिन आणि पासवर्ड तयार करुन ऑनलाईन बेटिंग सुरु केले.

सुरुवातीला बँक खात्यात आठ लाख रुपये जमा झाल्याचे व्यापाऱ्याला दिसलं. त्यानंतर व्यापारी जुगार खेळायला लागला. सुरुवातीला व्यापारी जिंकला. त्यानंतर तब्बल ५८ कोटी रुपये हरला. अनंत हा सतत जिंकत असल्याने व्यापाऱ्याला संशय आला. त्याने त्याला पैसे परत मागितले. मात्र अनंतने पैसे देण्यास नकार दिला. याशिवाय त्याला कुठे वाच्यता केल्यास अपहरण करुन मारण्याचीही धमकी दिली. त्यातून त्याने उर्वरित चाळीस लाख रुपयेही अनंतला दिले. यानंतर व्यापाऱ्याने पोलिसात तक्रार दाखल केली. सायबर पोलिसांनी ऑनलाईन फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

यानंतर नागपूर गुन्हे शाखा आणि गोंदिया गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीच्या गोंदियातील घरी धाड टाकली असता, त्याच्याकडून जवळपास १८ कोटी रोख, १५ किलो सोने आणि २० किलो चांदी जप्त करण्यात आली. आरोपी अनंत जैन हा गोंदियातील क्रिकेट सट्टेबाज असल्याचं समोर आलं आहे. या ऑनलाईन फसवणुकीमुळे एकच खळबळ उडाली आहे.

# लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त विधान भवनात अभिवादन

मुंबई: लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती आज विधान भवनात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळाचे सचिव (१) (कार्यभार) जितेंद्र भोळे यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळाचे उप सचिव (विधी) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव श्री.विजय कोमटवार यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही लोकमान्य टिळक यांच्या अर्धपुतळ्यास गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.


# रस्त्यांसाठी ७ कोटी निधी मंजूर : आ.बबनदादा शिंदे

बेंबळे/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील रस्त्यांचे कामासाठी पुरवणी अर्थसंकल्पात ७ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये पंढरपूर तालुक्यातील ५ रस्त्यांचा व माळशिरस तालुक्यातील २ रस्ते अशा एकूण ७ रस्त्यांच्या कामासाठी निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार बबनराव शिंदे यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार व बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे आमदार शिंदे यांनी रस्त्यांच्या कामासाठी पाठपुरावा केला होता. त्यानुसार पंढरपूर तालुक्यातील तुंगत ते कोळेकर वस्ती, मगर वस्ती रस्ता १ कोटी रुपये, बार्डी ते भोसे रस्ता १ कोटी, बेंबळे ते कान्हापुरी १ कोटी, शेगांव ते देगांव १ कोटी, शेवते- खळगे- पवार वस्ती १ कोटी तसेच माळशिरस तालुक्यातील विठ्ठलवाडी ते खाटमोडे वस्ती ६५ लाख, वाफेगाव ते बेंबळे रस्ता १ कोटी ३५ लाख असा एकूण ७ कोटी रूपये निधी मंजूर झालेला आहे.

# पत्रकार एकजुटीचा विजय दैनिक यश सिध्दी न्युज पत्रकार नामदेव निर्मळेपुढे केले दिलगिरी व्यक्त

टाकळीवाडी/प्रतिनीधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील आपले पत्रकार बंधू नामदेव निर्मळे यांना ग्रामपंचायत मध्ये बोलवून बातमी देऊ नका अशी धमकी वजा सूचना देण्यात आली होती. ही माहिती समजतात आपण सर्व पत्रकार बांधव त्यांच्या पाठीशी ठाम राहिलो व सोमवारी सकाळी ग्रामपंचायत मध्ये जाऊन ग्रामपंचायत सदस्यांना याबाबत जाब विचारण्याचे ठरले होते मात्र आज टाकळीवाडी येथे बैठक होऊन सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी व भारतीय जनता पार्टी जैन प्रकोष्ट कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष व भारतीय जनता पार्टी टाकळीवाडी शाखा अध्यक्ष मा.श्री जयपाल काणे तात्या यांनी मध्यस्थी करून विषय मिटवलेला आहे. सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेविका मॅडम यांना सूचना केलेली आहे. परत असे कोणते कृत्य पत्रकार मंडळी बरोबर करणार नाही. असे आश्वासन दिले आहे .व दिलगिरी व्यक्त केली आहे.

दिलगिरी व्यक्त केल्यामुळे हा विषय येथे स्थानिक पातळीवर सर्वांच्या विचाराने संपवण्यात आलेला आहे. हा आपल्या सर्व पत्रकार बांधवांचा विजय आहे आपण सर्व पत्रकारांनी लगेच धाव घेऊन नामदेवाच्या पाठीशी ठाम राहिल्याबद्दल सर्वांचे विजय आहे असेच एकजूट होऊन इथून पुढेही आपण काम करू या लोकशाही मध्ये पत्रकारांना त्याची पत्रकारिता करीत असताना त्यांना धमकावणे चुकीचे बाब आहे या परिसरातील सर्व पत्रकार एकत्र येवून


भारतीय जनता पार्टी
शिरोळ तालुका
तालुका चिटणीस श्री.जयपाल आण्णाप्पा काणे
दिनांक 23/7/2023

पत्रकारावर होत असलेल्या अन्यायाला न्याय दिले त्या सर्व पत्रकाराचे अभिनंदन दैनिक यश सिध्दी न्युज परिवाराच्या वतीने करण्यात येत आहे